दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २७५ वा मंगळवार दि.२९ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

### लातूर विमानतळ विस्तार करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचना

# लातूरचे विमानतळ लवकरच सुरू होणार

लातूर :-- लातूर विमानतळ विस्तारीकरण करण्यासाठी जमीन संपादित करून लवकरात लवकर विमानतळ चालू करण्या संदर्भातील मागणी भारतीय जनता पार्टीच्या नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती .त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी हे विमानतळ लवकरात लवकर सुरू करण्यासंदर्भात संबंधितांना सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार लातूरचे विमानतळ लवकरात लवकर सुरू होण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झालेल्या आहेत. भारतीय जनता पार्टीच्या नेत्या डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे लातूरच्या रखडलेले विमानतळ विस्तारीकरणासाठी लवकरात लवकर प्रयत्न करण्यासंदर्भाची मागणी केली होती. यासंदर्भात त्यांनी संबंधिताकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला होता. या पाठपुराव्याला यश मिळाले असून ,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी संचालक मंडळाची एक बैठक नुकतीच मंत्रालयात बोलावली होती .या बैठकीमध्ये त्यांनी लातूर विमानतळ विकास करण्यासंदर्भात संबंधितांना योग्य त्या सूचना केलेल्या आहेत. लातूर विमानतळाचा विकास करावा अशी लातूरातील सामाजिक ,औद्योगिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांची मागणी होती. या मागणीचा धागा पकडून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी



पाठपुरावा करत संबंधितांकडे पत्रव्यवहार केलेला होता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन त्यांच्याकडे या संदर्भात आग्रही मागणी केली होती,आणि लातूर विमानतळ विस्तारीकरणासाठी लवकरात लवकर प्रयत्न करावेत , अशी मागणी केली होती .त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी लातूर विमानतळाच्या विकासासाठी प्रयत्न करून विकासासाठी संबंधितांना योग्य त्या सूचना केलेल्या आहेत. लातूर विमानतळाचा विकास झाला तर बीड व धाराशिव सारख्या जिल्ह्यांनाही त्याचा लाभ मिळणार आहे .त्यामुळे डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या मागणी व पाठपुराव्याला यश मिळालेले आहे. लातूर हे शैक्षणिक हब म्हणून ओळखले जाते तसेच उद्योगाच्या दृष्टीने देखील हे शहर महत्त्वाचे शहर म्हणून ओळखले जाते परंतु येथे विमानतळ विमानतळाचे काम रखडले असल्यामुळे या विमानतळाचे विस्तारीकरण करण्याची मागणी बऱ्याच दिवसापासून प्रलंबित होती त्या मागणीला डॉक्टर अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या पाठपुराव्यामुळे यश मिळाले असून मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचनेमुळे आता हे विमानतळ लवकरात लवकर सुरू होण्यास मदत होणार आहे.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील उमेदवारांसाठी ३० एप्रिल पर्यंत रुजू होण्याचे आवाहन

लातूर :- राज्यातील युवक-युवतींच्या शिक्षणानंतर त्यांना प्रत्यक्ष कार्यानुभवाद्वारे रोजगारक्षमता वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ११ महिन्यांपर्यंत वाढविण्यास १० मार्च २०२५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ज्या उमेदवारांचा ६ महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी यापूर्वीच पूर्ण झाला आहे, अशा उमेदवारांनी पुढील ५ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी संबंधित आस्थापनांमध्ये ३० एप्रिल २०२५ पूर्वी रुजू व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेत पुन्हा रुजू झाल्याच्या दिनांकापासून ५ महिन्यांच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षण अनुज्ञेय राहील. या योजनेनुसार पुढील ५ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी नियुक्ती देताना संबंधित आस्थापनांनी सद्यस्थितीत कार्य प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी रुजू झाल्याच्या दिनांकापासून ११ महिने असेल, याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घ्यावी. ज्या उमेदवारांचा ६ महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी यापूर्वीच पूर्ण झाला आहे, अशा उमेदवारांना पुढील ५ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी रुजू होण्याबाबत ३० एप्रिल २०२५ पूर्वी कळविण्यात यावे. यापूर्वी या योजनेत सहभागी असलेल्या खाजगी आस्थापनांनी सर्टिफिकेट ऑफ इन्कॉर्पोरेशन, उद्यम आधार, ईपीएफ/ईएसआयसी/जीएसटी/डीपीआयटी यापैकी किमान दोन प्रमाणपत्रे ह्ीींिि:/ /ु.लाूझ्रू.रिहरीुरूरा.सीें.ळप या संकेतस्थळावर शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सादर करावीत. यापूर्वी रुजू झालेल्या तसेच नव्याने रुजू होणाऱ्या उमेदवारांनी संबंधित आस्थापनेत किंवा त्यांच्याशी संलग्न इतर आस्थापना/कार्यालयांत यापूर्वी कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत नसल्याबाबत तसेच कोणतेही हितसंबंध नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुजू होताना सादर करणे बंधनकारक राहील. संबंधित आस्थापनांनीही कार्य प्रशिक्षणासाठी रुजू होणारा उमेदवार यापूर्वी सदर आस्थापनेत किंवा त्यांच्याशी संलग्न इतर आस्थापना/कार्यालयांत कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. दोन्ही प्रतिज्ञापत्रे संबंधित आस्थापनांनी उमेदवार रुजू झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर येथे सादर करावीत. प्रशिक्षणार्थ्यांना रुजू करून घेताना काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे आवाहन लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## लव्हुरी केंद्राची एप्रिल २०२५ ची शिक्षण परिषद संपन्न.


केज/प्रतिनिधी
केज तालुक्यातील लव्हुरी येथील केंद्राची माहे एप्रिल २०२५ च्या शिक्षण परिषदेच्या अध्यक्ष सरपंच पंडित चाळक शाळा व्यवस्थापन समिती लव्हुरी चे अध्यक्ष, लव्हुरी केंद्राचे केंद्रप्रमुख राधाकिसन कांबळे, केंद्रीय मुख्याध्यापक श्री चाटे श्रीराम व जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या शिक्षण परिषदेत निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत देवाणघेवाण, अनुभव चर्चा,



गणित वर्ग नियोजन,विद्यांजली, निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी,भाषा कृतीचा बुधवार व गणित कृतीचा गुरुवार, लोकसहभाग या विषयावर लव्हुरी केंद्राचे केंद्रप्रमुख राधाकिसन कांबळे सर,आतिष गाढवे, विक्रम डोईफोडे, श्रीराम चाटे केंद्रीय मुख्याध्यापक यांनी सविस्तर माहिती देऊन उद्बोधन केले. शेवटी आभार श्रीराम देशमुख यांनी मानले.
यावेळी राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी, दादासाहेब गिते मु.अ.प्रा.शा.येवता,अंकुश मोराळे यांच्यासह केंद्रातील शिक्षक या शिक्षण परिषदेस उपस्थित होते.

## लेक यूपीएससी पास, पेढे वाटताना वडिलांना हार्टअटॅक, महाराष्ट्र हळहळला!

यवतमाळ : केंद्रीय लोकसेवा परीक्षेचा निकाल जाहीर झाला. लेक यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचं कळताच पेढे वाटत आनंदोत्सव साजरा करताना वडिलांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यातच त्यांचे निधन झाल्याची दु:खद घटना घडली . यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातल्या वागद ( इजारा) येथे घडलेल्या या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे.
प्रल्हाद खंदारे असे मृत्यमुखी पडलेल्या वडिलांचे नाव आहे .यूपीएससीच्या निकालानंतर मोहिनी प्रल्हाद खंदारेच्या वडिलांच्या निधनाने संपूर्ण खंदारे कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत चांगली



रँक मिळवत मोहिनी खंदारे या तरुणीनं कुटुंबीयांची मान उंचावली खरी मात्र आपल्या यशाचा आनंद साजरा करणाऱ्या वडिलांवर काळाने घाला घातल्याने मोठे यश आयुष्यभराचं दु:ख देऊन जाणारं ठरले आहे.
केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात मोहिनी प्रल्हाद खंदारे हिला ८८४ रँक मिळाला. मुलगी प्रशासकीय अधिकारी होणार या बातमीने सुखावलेल्या वडिलांनी गावकऱ्यांना पेढे वाटायला सुरुवात केली. ग्रामस्थांना पेढे वाटतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. यातच त्यांचा मृत्यू झाला. एकीकडे मुलीचा आनंदाचा दिवस दुसरीकडे वडिलांच्या मृत्यूने क्षणार्धात कुटुंब पोरके झाले. प्रल्हाद खंदारे असे मोहिनीच्या वडिलांचे नाव आहे. पुसद पंचायत समिती बुलढाणा येथे ते सेवानिवृत्त विस्तार अधिकारी होते . त्यांच्या मृत्यूने सारा गाव हळहळलाय.

## जीएम आझाद ग्रुपचे अध्यक्ष शाहरुख पटेल यांच्या मार्फत मोफत पाणी वाटपाचा मंगळवारी शुभारंभ जीएम आझाद ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

केज/प्रतिनिधी – उन्हाळ्याच्या झळा सामन्य नागरीकांना लागत असुन, तापमान फारच वाढलेले आस्ताना कडक उन्हाच्या झळा लक्षात घेऊन जीएम आझाद ग्रुपचे अध्यक्ष शाहरुख पटेल यांच्या मार्फत मोफत पाणी वाटप करण्यात येणार आहे याचा मंगळवारी रोजी शुभारंभ करण्यात येणार आहे.जीएम आझाद ग्रुपच्या स्तुत्य उपक्रमाचे व ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शाहरुख (भैया) पटेल यांचे कौतुक होत आहे.



मंगळवार दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी सायं. चार वाजता एल.एफ.सी. चौक महात्मा फुले नगर केज येथे वाटपाचा भव्य शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या हस्ते संपन्न होणार आहे ,तर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेविका सौ. पद्मिनी अक्का शिंदे व जन विकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.
सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते काल. सुमित बप्पा शिंदे यांच्या प्रतिमेस व चौकास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात येणार आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत सर्वत्र पाणीटंचाई भासत आहे म्हणून सामाजिक बांधिलकी जपत जीएम आझाद ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शाहरुख (भैय्या)पटेल यांच्यावतीने टँकर द्वारे मोफत पाणी वाटप करण्यात येणार आहे.
तरी नागरिकांनी या मोफत पाणी वाटपाचा लाभ घ्यावा असे आवाहन जीएम आझाद ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शाहरुख भैय्या पटेल व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

## मांजरा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांच बिनविरोध निवड

लातूर : देशात व राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखानदा रीत नावलौकिक असलेल्या शेतकरी सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या लातूर विलासनगर येथील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख तर व्हॉईस चेअरमनपदी संचालक अशोकराव काळे (चिकुर्डा) यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून बिनविरोध निवडून येण्याची परंपरा असलेल्या मांजरा साखर कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख हे पाचव्यांदा चेअरमन म्हणून निवड झाली असून ते सलग १९८५ पासून मांजरा साखर कारखान्याचे संचालक ४० वर्षापासून आहेत हे विशेष आहे.
मांजरा कारखान्याची निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली नुतन संचालक मंडळाची चेअरमन व व्हाइस चेअरमन पदाची निवड करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी संगमेश्वर बदनाळे यांच्या अध्यक्षतेखाली दि २८ एप्रिल २०२५ रोजी बैठक संपन्न



झाली चेअरमन पदासाठी दिलीपरावजी देशमुख व व्हॉईस चेअरमन पदासाठी अशोक काळे यांचे एकेक अर्ज आल्याने दोघांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.
इतर साखर कारखान्यापेक्षा जास्त मांजरा परिवारातील साखर कारखाने पुढील हंगामात अधिक भाव देणार : माजी मंत्री दिलीपराव देशमुखयावेळी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख म्हणाले की सर्वसामान्य शेतकरी आपल्या प्रपंचामध्ये गुंतलेला असतो शेतकऱ्यांचे हित आपण सर्वजण पाहतो या मागच्या हंगामात मांजरा परिवारातील साखर कारखान्याने जो भाव शेतकऱ्यांच्या उसाला दिला त्यापेक्षा अधिकचा भाव पुढच्या हंगामात देऊ विकास हा कधी थांबत नसतो तो सातत्याने करत राहावा लागतो कारखान्याची नेहमी परीक्षा असते ऊस कमी झाला तरीही व ऊस अधिक झाला तरी मांजरा परिवारातील साखर कारखान्याला लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मदत करते असे त्यांनी सांगून चेअरमन पदाची संधी दिल्याबद्दल सर्व संचालक मंडळ शेतकरी सभासदांचे आभार व्यक्त केले.मराठवाडा विदर्भात मांजरा परिवार पहिल्या स्थानावर : माजी मंत्री आमदार अमित देशमुखया प्रसंगी कारखान्याचे संचालक आमदार अमित देशमुख यांनी सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांच्या कार्याचा गौरव करत असताना त्यांच्या नेतृत्वाखाली मांजरा परिवारातील साखर कारखाने यशस्वी वाटचाल करत आहेत. योग्य नियोजन व प्रामाणिक हेतू अंगीकारून मांजरा कारखाना यापुढे देखील आपली यशस्वी घोडदौड कायम ठेवेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आदरणीय साहेब यांच्याच मार्गदर्शनाखाली मांजरा साखर परिवारातील साखर कारखाने अतिशय सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून कार्य करत अधिक भाव देण्याचा प्रयत्न केला असून राज्यात मराठवाडा व विदर्भात मांजरा साखर परिवार अधिक भाव व उसाचे गाळप करण्यात अव्वल स्थानावर असल्याचे सांगीतले.यावेळी नूतन व्हॉईस चेअरमन अशोकराव काळे यांनी मनोगत व्यक्त केले तर आभार प्रदर्शन श्रीशैल्य उटगे यांनी मानलेयाप्रसंगी माजी आमदार तथा विलास कारखाना व्हाइस चेअरमन वैजनाथ शिंदे, राज्य साखर संघाचे संचालक आबासाहेब पाटील, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे,रेणा साखरचे चेअरमन अनंतराव देशमुख, उपाध्यक्ष अँड प्रविण पाटील, संत शिरोमणी साखर कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, उपाध्यक्ष सचिन पाटील, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, २१ शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष संतोष देशमुख,शहर काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, विलास बँकेचे उपाध्यक्ष समद पटेल, काँग्रेसचे समन्वयक सचिन दाताळ, मांजरा परिवाराचे माध्यम समन्वयक हरिराम कुलकर्णी, मांजरा साखर कारखान्याचे नूतन संचालक श्रीशैल्य उटगे,मदन भिसे, नवनाथ काळे, वसंत उफाडे,कैलास पाटील,धनराज दाताळ, तात्यासाहेब देशमुख, ज्ञानेश्वर पवार, भैरू कदम, सदाशिव कदम, निळकंठ बचाटे, सचिन शिंदे, दयानंद बिडवे, निर्मला चामले, छायाताई कापरे, कार्यकारी संचालक पंडीत देसाई, आदींची उपस्थिती होती.

# संपादकीय

## सिंधू कराराला स्थगिती, ‘कठोर पण योग्यच’

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने भारत हादरून गेला. या भ्याड हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा बळी गेला आहे. यामागे पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद असल्याचे स्पष्टपणे उघड झाले आहे. याला प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारने २३ एप्रिल रोजी सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीच्या (सीसीएस) बैठकीत ऐतिहासिक सिंधू जल करार तत्काळ स्थगित करण्याचा निर्णय घेतला. हा करार १९६० मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात जागतिक बँकेच्या मध्यस्थीने करण्यात आला होता. सिंधू नदी खोर्‍यातील सिंधू, झेलम, चिनाब, रावी, सतलज आणि व्यास या सहा नद्यांच्या पाणी वाटपाचे नियमन हा करार करतो.

सिंधु जल कराराला स्थगिती देण्याचा भारत सरकारचा हा निर्णय केवळ देशाचे सार्वभौमत्व आणि सुरक्षेच्या बाबतीत असलेला निर्धार दाखवत नाही, तर दहशतवाद आणि शांतता एकत्र नांदू शकत नाही, असा पाकिस्तानला ठामपणे संदेश देत आहे. सिंधू जल करार हा भारतासाठी अनेक वर्षांपासून एकतर्फी बोजा ठरत आहे. या करारानुसार भारताला केवळ पूर्वेकडील नद्यांवर (रावी, सतलज, व्यास) संपूर्ण हक्क देण्यात आले आहे, तर पश्चिमेकडील नद्यांचे (सिंधू, झेलम, चिनाब) सुमारे ८० टक्के पाणी पाकिस्तानला देण्यात आले आहे. जरी या नद्या भारतातून विशेषतः जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशातून वाहत असल्या तरी त्यातील पाण्याचा बहुतांश अधिकार पाकिस्तानला मिळाला आहे. जरी पाकिस्तानने वारंवार भारताविरोधात दहशतवादी कारवायांना पाठबळ दिले असले तरी भारताने नेहमीच या कराराचे पालन केले आहे. २०१९ मधील पुलवामा हल्ल्यापासून ते २०२५ च्या पहलगाम हल्ल्यापर्यंत पाकिस्तानच्या कुरापतखोर कृत्यांनी या कराराच्या आत्म्यालाच नेहमीच तडा दिला आहे. त्यामुळे भारताचे रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, हे वक्तव्य नैतिक व धोरणात्मक दृष्टीने योग्यच असल्याचे बघायला मिळत आहे.

भारताने सिंधू जल करार स्थगित करून केवळ आपली मुत्सद्देगिरीच नाही तर धोरणात्मक सामर्थ्यही सिद्ध केले आहे. सरकारचा थेंब थेंब पाण्यासाठी पाकिस्तानला झगडायला लावू हा दावा हा भारताच्या निर्धाराचे प्रतीक आहे. जरी पश्चिमेकडील नद्यांचे पाणी थांबविणे तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असले, तरी भारताची जलव्यवस्थापन व अभियांत्रिकी क्षमता अपार आहे. किशनगंगा व रातले प्रकल्प हे त्याचे यशस्वी उदाहरण आहेत. भारतातील विद्यमान प्रकल्प म्हणजेच सतलज नदीवरील भाक्रानांगल धरण आधीच पूर्ण क्षमतेने काम करत आहेत. तसेच नवीन प्रकल्पांच्या निर्मितीसाठी सध्या देशात हजारो अभियंते, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञ उपलब्ध आहेत. जरी जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेश हे भूकंपप्रवण क्षेत्र असले, तरी भारताने टिहरी धरणासारख्या भूकंपसुरक्षित प्रकल्पांची यशस्वी उभारणी केली आहे हे याठिकाणी लक्षात घ्यायला हवे. यासारख्या प्रकल्पांमध्ये भारत सरकारने अब्जावधी रुपयांची गुंतवणूक होईल. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था २०२५ मध्ये जगातील सर्वात वेगाने वाढणार्‍या अर्थव्यवस्थांपैकी एक असल्याचे टिहरीसारखे आणखी प्रकल्प उभारणीसाठी भारत सरकार सक्षम आहे. तसेच या प्रकल्पांमुळे स्वच्छ ऊर्जा, सिंचन, रोजगार आणि ग्रामीण विकासालाही चालना मिळेल.

भारत नेहमीच पर्यावरणाबाबत सजग राहिला आहे. सरकारने पाण्याच्या शाश्वत वापरासाठी नमामी गंगा, जलशक्ती अभियान यांसारख्या योजना राबवल्या आहेत. नवीन धरणांमध्ये पर्यावरणपूरक डिझाईन, कमी विस्थापन आणि जैवविविधतेचा विचार केला जात आहे. सिंधू जल करार हा जागतिक बँकेच्या मध्यस्थीखालील एक आंतरराष्ट्रीय करार आहे. त्यामुळे त्याची स्थगिती काही राजनैतिक आव्हाने उभे करू शकते. परंतु, भारताची जागतिक पत ही सध्या खूपच चांगली आहे.

भारत हा क्वाड, जी-२० आणि ब्रिक्स यांसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर प्रभावपणे भूमिका बजावत आहे. पाकिस्तान जर संयुक्त राष्ट्रसंघ अथवा आंतरराष्ट्रीय न्यायालयात गेला, तर भारताकडे दहशतवादाविरोधातील ठोस पुरावे आहेत. लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मदसारख्या गटांना पाकिस्तानचा पाठिंबा ही बाब आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानला अडचणीत आणू शकते. सिंधू नदीचा काही भाग तिबेटमधून येतो, त्यामुळे चीनच्या हस्तक्षेपाची शक्यता असली, तरी ब्रह्मपुत्रा आणि सतलजसारख्या नद्यांवर भारताने आपली भूमिका आधीच बळकट केली आहे. गलवान खोर्‍यातील संघर्षानंतर भारताने सीमांवर आपली लष्करी क्षमता वाढवली आहे. अमेरिका, युरोपीय संघ आणि अन्य पाश्चिमात्य देशही भारताच्या दहशतवादाविरोधी भूमिकेला पाठिंबा देताना दिसत आहेत.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यामुळे भारतात संतापाची लाट उसळली आहे. सरकारने सिंधू जल करार स्थगित करून, पाकिस्तानी राजनैतिक संख्येवर मर्यादा, व्हिसा रद्द करणे, वाघा बॉर्डर बंद करणे यांसारखे धाडसी निर्णय घेत पाकिस्तानला बॅकफूटवर ढकलले आहे. भारत सरकारने या प्रकरणी कोणत्याही प्रकारची दयामाया दाखविलेली नाही हे विशेष! २०१६ मधील सर्जिकल स्ट्राईक, २०१९ मधील बालाकोट एअर स्ट्राईकनंतर आता २०२५ मध्ये सिंधू जल कराराला स्थगिती देऊन भारताने घेतलेला निर्णय हा ‘कठोर परंतु योग्य’! असल्याचे धोरणावरून दिसत आहे.

सिंधू नदीच्या २० टक्के पाण्याचा संपूर्ण वापर, पंजाब आणि राजस्थानमधील कालवे आणि सिंचन व्यवस्था सुधारणे हे कृषी, उद्योग आणि नागरिकांसाठी फायदेशीर ठरू शकतो. दहशतवादविरोधात गुप्तचर यंत्रणा, सीमा सुरक्षा आणि तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण व रोजगार वाढवणे आवश्यक आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याने भारताला एकजुटीने जागे केले आहे. जनता सरकारच्या निर्णयामागे ठामपणे उभी आहे. सिंधू जल कराराला स्थगिती हा केवळ प्रतिसाद नाही, तर सुरक्षित, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारताच्या दिशेने टाकलेले निर्णायक पाऊल आहेत.

# मत्स्य व्यवसायाच्या अर्थव्यवस्थेला बळ

मत्स्य व्यवसायाला महाराष्ट्र राज्य सरकारने कृषीचा समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय घेतला आणि कोकणची ७२० कि.मी. लांबीची किनारपट्टी आनंदीत झाली. केवळ आणि केवळ मासेमारी हाच व्यवसाय असलेल्या किनारपट्टीवरील १०३ गावांची आर्थिक भरभराट होणार असल्यामुळे या गावांमध्ये उत्सव आणि जल्लोष सुरू आहे. राज्याचे मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी गेल्या दीड महिन्यात सर्व ताकद वापरून राज्य सरकारकडून हा निर्णय करून घेतला. गेल्या २२ तारखेला राज्य मंत्रिमंडळाने या निर्णयाला हिरवा कंदील दाखवला आहे.



राज्य सरकारकडून कृषी क्षेत्रासाठी ज्या योजना राबविल्या जातात तशाच योजना आता मत्स्य व्यवसायासाठी अमलात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शेतकरी सन्मान योजनेची वर्षाकाठींचे ६ हजार रुपये आता कोकणातील मच्छीमार बांधवांनाही लागू झाले आहेत. पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांना खेटून ही कोकण किनारपट्टी आहे. या जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नात मत्स्य व्यवसायाचा वाटा तसा लक्षवेधी आहे, पण या निर्णयानंतर आता मोठ्या प्रमाणात मत्स्य उत्पादनात वाढ होईल हे निश्चित आहे. खरेतर देशातल्या आंध्र प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, कर्नाटक, बिहार या राज्यांनी मत्स्य व्यवसायासाठी यापूर्वीच कृषी क्षेत्राप्रमाणेच अनेक योजना राबविल्या.

परिणामस्वरूप गेल्या सहा वर्षांमध्ये देशात सर्वात मत्स्य उत्पादन घेणार्‍या आंध्र प्रदेशच्या उत्पन्नात ५० टक्क्याने वाढ झाली आहे. कर्नाटक राज्याने तर ही वाढ १०३ टक्केपर्यंत नेली आहे. छत्तीसगड ७२ टक्के आणि झारखंड राज्याने ५० टक्केपर्यंत मत्स्योत्पादनात वाढ केली आहे. तद्वतच महाराष्ट्रात तर मत्स्योत्पादन वाढीला खूप मोठा वाव आहे. समुद्र किनारपट्टीसोबतच भूजलाशयीन मासेमारी महाराष्ट्रात सुमारे ४ लाख हेक्टर क्षेत्रावर होते. यामध्ये अर्थातच तलावे, नदी आणि मोठ्या धरणांचा समावेश आहे. महाराष्ट्रामध्ये समुद्रातील मासेमारीचे वार्षिक उत्पादन जवळपास ४ लाख ५० टन इतके आहे तर गोड्या पाण्यातील मासेमारी दीड लाख टन इतकी होते. या नव्या निर्णयामुळे पुढच्या तीन-चार वर्षांत हे मत्स्योत्पादन १० लाख टनाच्या वर जाऊ शकते. कोकण किनारपट्टीवर ५ हजारपेक्षा अधिक ट्रॉलिंग आणि गिलनेटच्या बोटी समुद्रात मासेमारी करतात. मत्स्य व्यवसायाकडे आजवर तितकेसे राज्य सरकारने गांभिर्याने लक्ष दिले नव्हते. त्यामुळे कोकण समुद्रातील हा मच्छीमार तसा संघर्षच करत होता. त्याचा गैरफायदा परप्रांतीय ट्रॉलर्स सतत घेत होते. त्यांचे आक्रमण अनेकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण करत होती. अनेक राज्यांमधील सरकारचा आश्रय असलेल्या या परप्रांतीय मच्छीमारांशी दोन हात करताना कोकणातील मच्छीमारांना लढाया लढाव्या लागत होत्या. आता मात्र या नव्या धोरणामुळे मच्छीमाराच्या अर्थव्यवस्थेला बळ मिळाले आहे. याचा फायदा परदेशातील निर्यातीच्या वाढीमध्ये होईल. मत्स्योत्पादन वाढेल आणि मच्छीमारांच्या घरी आर्थिक समृद्धी येईल.

कृषीचा दर्जा दिल्यामुळे मच्छीमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्यकांस्यकार यांना कृषी क्षेत्राप्रमाणे अनेक योजनांचा लाभ मिळणार आहे. विजेच्या दरात सवलत मिळेल. त्यामुळे मत्स्य बीज केंद्रे, प्रक्रिया युनिट, मत्स्य विक्री केंद्रे, मत्स्य शेती यासाठी विजेची सवलत मिळणार आहे. यापुढे शेतकर्‍यांप्रमाणेच मत्स्य व्यवसायासाठी मच्छीमारांनाही विमा सवलत मिळणार आहे. तोक्ते, निसर्ग सारखी चक्रीवादळे सर्वात जास्त मच्छीमारांचे नुकसान करून जातात. यापुढे या मत्स्य व्यावसायिकांना कृषी क्षेत्राप्रमाणे नुकसानभरपाई मिळणार आहे.

# भाऊसाहेब, ओव्हर टेकने काय मिळते हो???...

(ओव्हर टेक विशेष.)

कारण हम भी किसीसे कम नही! हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून सदैव सैनिका पुढेच जायचे! या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. ही मार्गदर्शक जाणिव जागृती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दातून जरूर वाचा... संपादक.

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो. मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वर्दळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण हम भी किसीसे कम नही! हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून सदैव सैनिका पुढेच जायचे! या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. किंवा नुसतीच त्याला मिरवायचे असते की आपण किती कार्यतत्पर आहोत. आपली कामाची उरक लोकांच्या डोळ्यांत त्वरेने भरण्याची घाई त्याला झालेली असते. जशी आपल्याकडे झाडीबोलीतील एक म्हण प्रसिद्ध आहे तशी-

येलपाडीचे (मिजासखोर स्त्रीचे) आले डोळे।
खाटले ठेवून खाल्या लोळे।।

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली. तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली? म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो? तरीही बिचारा युवक शांतच! अशा या भानगडी विनाकारण जीवावर बेतत असतात. तरीही ओव्हर टेकर्सना यात काहीच कशी लाज-शरम वाटत नाही? ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद प्राप्तीसाठी अशी तातडी, असे साधकांना ओव्हर टेक करणारे महाभाग मात्र क्वचितच दृष्टीस पडतात. कारण या आध्यात्मिक, भक्तिमार्गावर चालणारा लंगडालुळा होत नाही तर त्याचा थेट पुनर्जन्मच होतो, एक खरा भला माणूस म्हणूनच!

समजा, आपली एखादी मूल्यवान वस्तू घरातच कुठेतरी हरवली. ती जोपर्यंत आपल्या दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मनास चैन पडेल तर शप्पथ! ती शोधण्यासाठी आपण एका पाठोपाठ एक साधन वापरतो. कधी काठीने, कधी झाडूने ओढून, ढकलून वा चाचपडून बघतो. तर कधी विजेरीचा प्रकाशझोत टाकून डोळे फाडफाडून पाहतो. ती वस्तू सांपडत नाही, तोवर शोध घेणे आपण थांबवित नाही. सहज एखादे सद्गृहस्थ यावे आणि वस्तू उचलून तुम्ही शोधत आहात ते हेच का? असे उच्चारताच आपली उत्सुकता शिगेला पोहोचते. झटकन ती वस्तू हातात घेऊन तिला निरखून बघतो आणि मोठ्या आनंदाने खड्या आवाज म्हणतो, अहो, ती हीच माझी अमोलक वस्तू! मी हीलाच शोधत होतो. असे म्हणून आपण पूर्वीप्रमाणे ती वस्तू शोधत राहाल का? नाही. आधी त्या दात्या व्यक्तीस अनेक नमस्कार घालतो, धन्यवाद देऊन त्याचे स्तुतीपाठ गातो. आजीवन ऋणी व उपकृत राहण्याचे बोलून दाखवितो व वचनबद्ध होतो. आपण परत त्याच वस्तूचा शोध सुरूच ठेवला, तर लोक आपल्याला नक्कीच मूर्ख ठरवतील. मात्र त्या वस्तूची स्वच्छता, सुरक्षा, सुशोभन, कलाकुसर, काळजी आदी वेळोवेळी चालवित असतो. अगदी असेच ब्रह्मानंद व इश्वरप्राप्तीस केल्या जाणाऱ्या भक्ती वा पुजापाठाचे आहे. विचारा, कसे? तर आपण पुजापाठ कशासाठी करतो? त्यामागील उद्देश साफ-स्पष्ट असावा लागतो. ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद मिळवावे, असा उद्देश असेल तर वरील दृष्टांत तंतोतंत लागू पडतो. त्यासाठीच आपण पुजापाठ, जप, तप, योगयाग करत असतो. परंतु अनेक शोध शोधांती एखादा ब्रह्मवेत्ता सद्गुरू मिळाला आणि त्याने ब्रह्मदर्शन घडवून दिले. तर मग परत तसलेच पुजापाठ करत बसणे योग्य राहील का? नाही ना! म्हणून मग केवळ ईश्वरास आमरण प्रसन्न ठेवण्यासाठी सद्गुरूच्या आदेश व वचनांचे पालन करत त्यालाच आपण सदैव हसतमुख ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे सर्वश्रूत आहे, हीच खऱ्या ब्रह्मानंदप्राप्त साधकांची परंपरा आहे. आपण जिथून सुरूवात केली होती, तिथे थांबून सांगावेसे वाटते, की ओव्हर टेक करणारास पुढे जाऊ द्या, पण मागे पडणाराने अजिबात चालाखी करू नये. पुढे जाणारास पुढ्यात घेऊन त्याच्या यशस्वीतेबद्दल सहकार्य द्यावे, यामुळे काय होईल? तर वाईट प्रसंग वा अप्रिय घटना अजिबात उद्भवणार नाही. वादंग वा हिंसाचाराला आपणच ब्रेक लावू शकाल, एवढे मात्र निश्चित! यात तुम्हाला जो आनंद मिळेल; तो खरोखरच ब्रह्मानंद असेल..!

**********

- लेखक -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
(मराठी- हिंदी लेखक आणि कवी)
द्वारा- प.पू. गुरुदेव हरदेव कृपानिवास.
मु. रामनगर वॉर्ड नं. २०, गडचिरोली.
फक्त व्हॉट्स प- ९४२३७१४८८३.

# दशकपूर्ती महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची!

राज्यातील नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने लोकसेवा देता याव्या यासाठी शासनाने 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' लागू केला आहे. यामुळे शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी निश्चित झाली आहे. हा अधिनियम २८ एप्रिल २०१५ रोजी अंमलात आला असून राज्यात हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण होत असून त्यानिमित्त हा विशेष लेख

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा कायदा राज्यातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या कायद्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे. हा अधिनियम संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार पात्र असलेल्या व्यक्ती व लोकसेवा देणारी सार्वजनिक प्राधिकरणे यांना लागू होतो. तसेच, या अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेल्या सर्व सेवांसाठी हा कायदा लागू आहे.

या कायद्याचा मुख्य उद्देश हा पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम आणि वेळेत लोकसेवा पुरवणे आहे. यासोबतच, लोकसेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे हे देखील या कायद्याचे उद्दिष्ट आहे.

एखाद्या व्यक्तीची पात्रता संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार ठरविली जाते. विशेष म्हणजे, या कायद्यानुसार सार्वजनिक सेवा मिळवण्यासाठी कोणताही पात्र व्यक्ती अर्ज करु शकते. परदेशात राहणारी एखादी व्यक्ती कोणत्याही अधिसूचित सेवेसाठी पात्र असेल, तर तीदेखील या कायद्यानुसार सेवा प्राप्त करू शकते.

गेल्या दहा वर्षात १८ कोटींपेक्षा अधिक अर्जदारांनी या अधिनियमानुसार अधिसूचित सेवा मिळविल्या आहेत. आपले सरकार पोर्टल यांसारख्या उपक्रमांनी नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात सुलभता आणली आहे. सर्व विभागांच्या मिळून एक हजारपेक्षा जास्त सेवा अधिसूचित असून त्यापैकी त्यापैकी ५८३ सेवा आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध आहेत. एकूण १ कोटी पेक्षा अधिक नागरिकांनी आपले सरकार पोर्टलवर रजिस्ट्रेशन केलेले आहे.

सेवेचा अधिकार म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या वेळेत लोकसेवा मिळवण्याचा हक्क. सार्वजनिक प्राधिकरणात शासनाचे विभाग, विविध सरकारी संस्था, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या अशासकीय संस्था यांचा समावेश होतो. प्रत्येक सेवेसाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या कायद्याची आणि नियमांची प्रत 'आपले सरकार' पोर्टल किंवा 'आरटीएस महाराष्ट्र' मोबाईल पवरून विनामूल्य डाउनलोड करता येते.

**सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका :**

या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अधिसूचित सेवा आणि त्यासंबंधीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य आहे. यासाठी, राजपत्रात अधिसूचना प्रकाशित करण्यात येते. सार्वजनिक प्राधिकरणाने पुरविलेल्या लोकसेवांची यादी, त्यासाठी लागणारा वेळ, विहित शुल्क, पदनिर्देशित अधिकारी आणि अपील प्राधिकाऱ्यांचे तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि त्यांच्या वेबसाइटवर किंवा पोर्टलवर दर्शविण्यात येतात. ही माहिती प्रदर्शित केली नाही, तर मुख्य आयुक्त किंवा संबंधित आयुक्त स्वतः दखल घेऊन कारवाई करू शकतात.

लोकसेवा मिळवण्यासाठी आवश्यक असणारी विविध प्रमाणपत्रे, कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे कमी करण्यावर या कायद्यात भर देण्यात आला आहे.

**अर्ज कुठे करावा?**

लोकसेवा मिळवण्यासाठी अर्जदारास पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे, प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन किंवा 'आपले सरकार सेवा पोर्टल' वरून ऑनलाईन अर्ज करता येतो. प्रत्येक विशिष्ट सेवेसाठी अर्ज करण्याचा नमुना वेगळा असतो. अर्जाचा नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची यादी संबंधित कार्यालयात, 'आपले सरकार सेवा केंद्रां'मध्ये आणि संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते.

**ऑनलाईन अर्ज सुविधा:**

'आपले सरकार सेवा पोर्टल' (र्हीींिं://ररश्रिशीरीङ्करी. ारहरेपश्रळपश.सेीं.ळप) हे विविध विभागांच्या लोकसेवांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ आहे. जे नागरिक स्वतःहून अर्ज करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी राज्यभरात ३२००० हून अधिक 'आपले सरकार सेवा केंद्रे' (-डड्ढ) कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त, 'आरटीएस महाराष्ट्र' नावाचे मोबाईल पदेखील वापरकर्त्यांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. प्रत्येक ऑनलाईन अर्जाला एक विशिष्ट ओळख क्रमांक (युनिक आयडेंटिफिकेशन नंबर - णखछ) मिळतो, ज्यामुळे अर्जाच्या प्रगतीचा मागोवा घेणे सोपे होते.

जर एखाद्या पात्र व्यक्तीला विहित वेळेत सेवा मिळाली नाही किंवा तिचा अर्ज फेटाळला गेला, तर ती व्यक्ती प्रथम अपील प्राधिकरणाकडे अपील करू शकते. प्रथम अपील अर्ज सेवा नाकारल्याच्या किंवा विहित कालमर्यादा संपल्याच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत दाखल करता येतो. मात्र, जर अर्जदाराकडे वेळेत अपील न करण्याचे योग्य कारण असेल, तर प्रथम अपील प्राधिकरण विलंब माफ करून ९० दिवसांत अपील स्वीकारू शकते. अपील सुनावणीची नोटीस अर्जदाराला प्रत्यक्ष, नोंदणीकृत पोस्टाने, ईमेलद्वारे, एसएमएसद्वारे किंवा मोबाईल पद्वारे दिली जाते.

**आपले सरकार सेवा केंद्रांबाबत माहिती :**

'आपले सरकार सेवा केंद्रे' ही नागरिकांना सार्वजनिक सेवा मिळविण्यासाठी मदत करतात. ही केंद्रे तहसील, ग्रामपंचायती, नगरपालिका, आणि काही खाजगी ठिकाणीही उपलब्ध आहेत. ही केंद्रे आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सर्व विभागांच्या सेवा पुरवतात.

**लोकसेवेत कसूर झाल्यास कारवाई**

या अधिनियमात लोकसेवा पुरविण्यात किंवा अपिलांवर निर्णय घेण्यात अधिकाऱ्यांकडून कसूर झाल्यास दंडात्मक कारवाईची स्पष्ट तरतूद आहे.

**पदनिर्देशित अधिकाऱ्यावरील दंड:**

जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने विहित वेळेत योग्य कारणाशिवाय लोकसेवा दिली नाही, तर त्याच्यावर कमीतकमी ५०० ते कमाल ५,००० पर्यंत दंड आकारला जाऊ शकतो. प्रथम अपील प्राधिकारी सुनावणीनंतर हा दंड लावू शकतात.



वारंवार लोकसेवा देण्यात दिरंगाई झाल्यास किंवा अपील प्राधिकाऱ्याच्या निर्देशांचे पालन न केल्यास, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई देखील केली जाऊ शकते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि शासकीय कामांमध्ये पारदर्शकता आणणारा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी आपली भूमिका योग्य प्रकारे निभावणे आवश्यक आहे. नागरिकांनी देखील आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून या कायद्याचा योग्य वापर केल्यास त्यांना वेळेत आणि पारदर्शकपणे लोकसेवा मिळू शकेल.

--------------

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई

## संध्याकाळच्या वेळी भूक लागल्यानंतर काय खावं सुचत नाही? सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा फळांची चवदार भेळ

संध्याकाळच्या वेळी कामावरून थकून आल्यानंतर सगळ्यांचं भूक लागते. भूक लागल्यानंतर बऱ्याचदा चहा आणि बिस्किट खाल्ले जाते. मात्र मैद्याच्या बिस्किटांचे सतत सेवन करणे आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. यामुळे शरीराची पचनक्रिया बिघडू शकते. गॅस, ऍसिडिटी किंवा अपचनाची समस्या उद्भवून शरीराच्या कार्यात अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी लागली छोटीशी भूक भागवण्यासाठी नाश्त्यात हेल्दी आणि पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला संध्याकाळच्या वेळी लागलेली छोटीशी भूक भागवण्यासाठी फळांची चवदार भेळ बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. फळे खाणे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. यामध्ये असलेले विटामिन सी आणि इतर पोषक घटक आरोग्यासाठी अतिशय प्रभावी ठरतात. चला तर जाणून घेऊया फळांची भेळ बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य: सफरचंद लिंबाचा रस काळे मीठ गाजर बीट काकडी डाळिंब संत्र हिरवी मिरची कांदा चाट मसाला कुरमुरे चणे शेंगदाणे

कृती: फळांची भेळ बनवण्यासाठी सर्वप्रथम, सर्व भाज्या आणि फळे पाण्यात टाकून स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर मोठ्या वाटीमध्ये बारीक चिरून घेतलेली गाजर, बीट, काकडी, सफरचंद, डाळिंब, संत्र इत्यादी फळे आणि भाज्या टाकून मिक्स करा. नंतर त्यात लिंबाचा रस, चाट मसाला, काळे मीठ आणि कुरमुरे टाकून मिक्स करा. सगळ्यात शेवटी बारीक चिरून घेतलेली कोथिंबीर टाकून सर्व्ह करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली फळांची भेळ. फळांची भेळ खाल्यानंतर तुमचे पोट लगेच भरेल आणि कोणताही पदार्थ खाण्याची तात्काळ इच्छा होणार नाही. फळे आणि भाज्यांचे एकत्र सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात.

# रोज तुम्ही मृत्यूला कवटाळताय, 'रेडी टू ईट' पदार्थांनी पोखरतंय शरीर; वेळीच व्हा सतर्क

तुम्ही नियमितपणे रेडी टू ईट अन्नपदार्थ किंवा रेडी टू ईट हीट फूड खाता का? तर ही नक्कीच काळजी करण्यासारखी बाब आहे आणि त्याचं कारण म्हणजे अलिकडच्या एका जागतिक अभ्यासातून असे दिसून आले आहे की अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्न खाल्ल्याने अकाली आणि न टाळता येण्याजोगे मृत्यू होण्याचा धोका वाढताना दिसून येत आहे.

गेल्या काही अभ्यासांमध्ये सोडियम, ट्रान्स फॅट्स आणि साखरेचे प्रमाण जास्त असलेले अन्न - यांचा हृदयरोग, लठ्ठपणा, मधुमेह, विशिष्ट प्रकारचे कर्करोग आणि नैराश्य यासह ३२ वेगवेगळ्या आजारांशी संबंध असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अधिकाधिक अभ्यास करण्यात आला असून आता यावर नक्कीच आपण विचार करण्याची वेळ आली आहे (फोटो सौजन्य - ळडींलङ्क)

कुठे आणि कसा झाला अभ्यास? या नवीन अभ्यासात आठ देशांमधील अर्थात ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चिली, कोलंबिया, मेक्सिको, युनायटेड किंग्डम आणि युनायटेड स्टेट्स यांच्यामधील राष्ट्रीय स्तरावरील प्रतिनिधित्व करणाऱ्या आहार सर्वेक्षणांचे आणि मृत्युदराच्या डेटाचे विश्लेषण केले गेले. अमेरिकन जर्नल ऑफ प्रिव्हेंटिव्ह मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या निष्कर्षांवरून असे दिसून आले आहे की एखाद्या व्यक्तीच्या एकूण ऊर्जेच्या सेवनात णझऋचे प्रमाण वाढत असताना णझऋ च्या सेवनामुळे अकाली मृत्यूचा धोका लक्षणीयरीत्या वाढताना दिसून येतो आहे.




रेडी टू ईट फूड धोकादायक

निरोगी वातावरणाला प्रोत्साहन देणाऱ्या नियामक आणि राजकोषीय धोरणांद्वारे समर्थित, णझऋ चा वापर कमी करण्यासाठी जागतिक कृतीची आवश्यकता या अभ्यासातून बळकटी देते. णझऋ हे अन्नपदार्थांमधून काढलेल्या किंवा प्रयोगशाळेत संश्लेषित केलेल्या घटकांपासून बनवलेले रेडी टू ईट किंवा रेडी टू हीट इंडस्ट्रियल फॉर्म्युलेशन आहेत, ज्यांच्या संरचनेत संपूर्ण अन्न घटक कमी किंवा अजिबात नसतात, याची सामान्य माणसांना कल्पनाच नाहीये.

आर्टिफिशियल पदार्थांचा समावेश यूपीएफचा आरोग्यावर जास्त प्रमाणात असलेल्या प्रमुख पोषक घटकांच्या (सोडियम, ट्रान्स फॅट आणि साखर) वैयक्तिक परिणामांपेक्षा जास्त परिणाम होतो कारण औद्योगिक प्रक्रियेदरम्यान अन्नपदार्थांमध्ये बदल केले जातात आणि रंग, कृत्रिम रंग आणि गोड पदार्थ, इमल्सीफायर आणि इतर अनेक पदार्थ आणि प्रक्रिया सहाय्यकांसह कृत्रिम घटक वापरले जातात. म्हणूनच, यूपीएफच्या वापराशी संबंधित सर्व कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूंचे मूल्यांकन केल्याने आरोग्यावर औद्योगिक अन्न प्रक्रियेचा एकूण परिणाम अंदाज लावता येतो, असे ब्राझीलमधील साओ पाउलो विद्यापीठातील प्रमुख अन्वेषक एडुआर्डो एएफ निल्सन यांनी सांगितले आहे.

मृत्यूला आमंत्रण सुरुवातीला संघाने णझऋच्या आहारातील वाटा आणि सर्व कारणांमुळे होणाऱ्या मृत्युदरांमध्ये एक लिनिअर असोसिएशन अर्थात संबंध असल्याचा अंदाज लावला, ज्यामुळे आहारात णझऋ च्या वाट्यामध्ये प्रत्येक १०% वाढ झाल्याने सर्व कारणांमुळे होणाऱ्या मृत्युदराचा धोका ३% ने वाढला. त्यानंतर, प्रत्येक देशासाठी सापेक्ष जोखीम आणि अन्न वापर डेटा वापरून कोलंबियामध्ये एकूण ऊर्जेच्या सेवनाच्या १५% ते अमेरिकेत ५०% पेक्षा जास्त कॅलरीजपर्यंत त्यांनी एक मॉडेल तयार केले आहे.

अल्ट्रा-प्रोसेस्ड फूड्सचा कॅन्सर जोखीमीशी काय आहे संबंध, कसा बसणार आळा

काय सांगतो रिसर्च निकालांचा अंदाज आहे की णझऋ वापरामुळे होणाऱ्या सर्व कारणांमुळे टाळता येण्याजोग्या अकाली मृत्यूंचे प्रमाण कमी णझऋ वापर असलेल्या देशांमध्ये ४% ते सर्वाधिक णझऋ वापर असलेल्या देशांमध्ये जवळजवळ १४% पर्यंत असू शकते. उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये णझऋ वापर, जो आधीच जास्त आहे, तो एका दशकाहून अधिक काळ तुलनेने स्थिर राहिला आहे याबद्दल संघाने चिंता व्यक्त केली. दुसरीकडे, कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये वापर सातत्याने वाढत आहे.

वयाच्या २० व्या वर्षीही सडू शकते लिव्हर, १ घाणेरड्या सवयीमुळे तुम्हाला होऊ शकतो कॅन्सर

ताजे अन्न खावे

संशोधकांनी सांगितले की याचा अर्थ असा आहे की उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये सध्या संबंधित भार सर्वाधिक आहे, परंतु इतर देशांमध्ये तो वाढत आहे. यावरून असे दिसून येते की जागतिक स्तरावर णझऋ वापराला परावृत्त करणाऱ्या आणि स्थानिक, ताज्या आणि कमीत कमी प्रक्रिया केलेल्या अन्नावर आधारित पारंपारिक आहार पद्धतींना प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांची तातडीची गरज आहे, निल्सन यांनी आपला अभ्यास काय आहे याबाबत

# एकमेकात कसा रुजलाय बंधुभाव, बाबासाहेबांच्या जयंतीत नाचलाय सारा गाव..

केज/प्रतिनिधी -दिवसेंदिवस महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशासह विदेशात आणि देशातील खेडोपाड्यात,वाडी वस्तीवर मोठ्या उत्साहाने आणि जल्लोषात १४ एप्रिल पासून ३० एप्रिल पर्यंत मोठ्या जल्लोषात आणि उत्साहापुर्ण वातावरणात साजरी केली जात आहे. केज तालुक्यातही गावागावात ही जयंती सर्वत्र साजरी होताना दिसत आहे. त्याच अनुषंगाने नाव्होली येथेही दि.२४ एप्रिल गुरुवार रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या थाटामाटात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. या जयंती दिनी सर्व गावाने उत्साहाने सहभागी होत आनंदात नाचत वाजत गाजत गावातुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढून आगळ्यावेगळ्या पद्धतीने ही जयंती साजरी केली.




याबाबतची सविस्तर माहिती अशी की,डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचे कार्यच एवढे महान आहे की ते शब्दात कधीच सांगता येत नाही.या महामानवचा जन्मदिवस जगभरात मोठ्या जल्लोषात आणि उत्साहापुर्ण वातावरणात साजरा करण्यात येतो. त्याच प्रमाणे देशभरातील गावागावात ,वाडी,वस्ती आणि घरोघर हा जन्मदिवस उत्साहात साजरा केला जातो. केज तालुक्यातील नाव्होली या गावात सर्व समाजाचे लोक गुण्यागोविंदाने राहतात . तर या गावात सर्व धार्मिक, सामाजिक, सांप्रदायिक, सांस्कृतिक कार्यक्रम सर्वजण मिळुन अगदी आनंदाने पार पाडतात तशाच पद्धतीने बोधिसत्व, विश्व वंदनीय, महामानव प.पु.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या थाटामाटात आणि उत्साहापुर्ण वातावरणात दि. २४ एप्रिल २०२५ गुरुवार रोजी साजरी करण्यात आली. या जयंती दिनी सकाळी ९:००वा. गावातील समाजमंदिर या ठिकाणी गावच्या सरपंच सौ इंदुताई बिक्कड व रंजित बिक्कड यांनी सपत्नीक तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे धुप दिप प्रज्वलन करून त्यांना अभिवादन केले.यावेळी बौद्ध भिक्खू अर्थात भन्ते तथा भारतीय बौद्ध महासभेचे बिड जिल्हा कोषाध्यक्ष आणि नंदीग्राम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य आयु.एस.बी. शिंदे सर यांनी बुध्द वंदनेसह सर्व बौद्ध विधी घेवुन जमलेल्या गावकऱ्यांना आणि बौध्द अनुयायांना पाली भाषेतील धम्माचा उपदेश थोडक्यात विषद केला.या वेळी ग्रामसेवक बाबासाहेब हजारे,माजी सरपंच श्री. नामदेव बिक्कड (सर) ,माजी सरपंच दिलीपराव बिक्कड (सर), माजी उपसरपंच श्री.पांडुरंग धुमाळ , से.स.सो.चे व्हॉईस चेअरमन तानाजी देशमुख, अहमद शेख, सतीश बिक्कड,भागवत बिक्कड फौजी , जि.प.शाळा नाव्होलीचे





शिक्षक आरकडे सर , कांबळे सर, भास्कर बिक्कड सर, सुर्यकांत बिक्कड (विमा प्रतिनिधी), शिवाजी बिक्कड (माजी सैनिक) यांचेसह अंगणवाडी कार्यकर्त्या इंदुबाई गुंठाळ, वेणुताई लाड, भाग्यश्री गदळे,व मदतनीस अमीनाबी शेख, सविता चौरे, रेश्मा बाळशंकर व बचत गटाच्या प्रमुख रामकंवर शिंदे, छायाताई बिक्कड आणि ग्रामस्थ व गावातील सर्व भिम अनुयायी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तर सांयकाळी ५:०० वाजता बँडच्या सुमधुर आवाजात तोफांची आतषबाजी करत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रथामधुन भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीची सुरुवात बुध्द वंदने करण्यात आली. सदरील मिरवणूक ही समाजमंदिरा पासुन गावातील मुख्य रस्त्यावरून ते केज नांदूरघाट राज्यमार्गावरुन बसस्टॉपवर नेत भगवान बाबा चौकातील भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. हि मिरवणूक पुढे नेहुन बसस्टॉपवर मुस्लिम बांधवांच्या वतीने चाँद साहेब इनामदार,अहमद शेख, मुस्सा शेख , सद्दाम शेख रब्बानी सर अकबर शेख यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.हि मिरवणूक त्याच मार्गाने परत तर छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच हनुमान मंदिरासमोरील स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या चौकाला पुष्पहार अर्पण करून धुपदिप लावुन पूजन करून अभिवादन केले. व मिरवणूक समाजमंदिर समोर परत नेहुन प्रा. शिंदे सर यांनी बुध्द वंदना घेऊन रात्री ९:०० वा.कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी बाहेरून आलेले सर्व मान्यवर व भिम अनुयायी यांचा जयंती समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष माणिक बाळशंकर यांनी सर्व सहकार्यांना सोबत घेवुन जयंती निमित्त नाव्होली ग्रामस्थांसाठी जेवणाची पिण्याच्या पाण्याची सुंदर अशी व्यवस्था केली होती. या मिरवणुकीमध्ये गावातील सर्वांनी उत्साहाने सहभागी होत साळेगाव येथील जावेद भाई यांच्या सरगम बँन्जो बँडमधील प्रसिद्ध गायक दिपक भाई यांच्या सुमधुर भिमगितावर मात्र गावातील अबालवृद्ध, तरुण, तरुणी , महिला यांनी नाचण्याचा मनसोक्त आनंद घेतला. आणि या तालावर जणु सारा गावच थिरकला... दोन वर्षांतील ही दुसरी जयंती मोठ्या थाटामाटात आणि जल्लोषात व उत्सवात साजरी झाली. याची मात्र सर्वत्र चर्चा होत आहे.

**मिरवणुकीला पोलिसांची गैर हजेरी**

नाव्होली येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या मिरवणुकीचा परवाना जयंती समीतीच्या वतीने रितशीर घेण्यात आला होता. मात्र या मिरवणुकीसाठी केज पोलीस स्टेशनचे एकही कर्मचारी या ठिकाणी आले नाहीत.

**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी महावितरणने आपला जातीयवाद अखेर दाखवला...**

नाव्होली येथे दि.२४ एप्रिल गुरुवार रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे आयोजन केले होते.मात्र या दिवशी सकाळी ११ते ७:३० पर्यंत लाईट बंद करुन महावितरणने आपला जातीयवाद अखेर दाखवलाच.. संबंधित विभागाचे कर्मचारी यांना सांगुन देखील या दिवशी पुर्ण दिवस लाईट बंद केली होती. त्यामुळे स्पीकर वाजवता आले नाही .तर मिरवणूक देखील अंधारातच काढावी लागली.

# संत शिरोमणी गोरोबा काका यांची पुण्यतिथी साजरी




निलंगा / प्रतिनिधी :– संत शिरोमणी गोरोबा काका यांची पुण्यतिथी कुंभार गल्ली, दापका वेस येथे साजरी करण्यात आली. यावेळी ह भ प भुजंग पांचाळ महाराज यांचे किर्तन आयोजीत केले होते. त्यांनी संत गोरोबा काका यांचे जीवन व चरित्र सांगितले. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजनकरण्यातआलेहोते.
यावेळी मोठ्या संख्येने महिला पुरुष उपस्थित होते. यावेळी दत्ता मोहोळकर, रवि मोहोळकर, सुधाकर मोहोळकर, पद्माकर मोहोळकर, किशोर मोहोळकर, विक्रम मोहोळकर, गणपत मोहोळकर, युवराज मोहोळकर, डव्होकेट रमेश मोहोळकर, प्रसाद मोहोळकर, गोपाळ मोहोळकर, सोमनाथ मोहोळकर, राजू मोहोळकर, मनोज मोहोळकर, संतोष मोहोळकर, लक्ष्मण मोहोळकर, नागनाथ मोहोळकर, बालाजी मोहोळकर, माधव मोहोळकर, श्रीराम कुंभार, गोविंद मोहोळकर, गुरुनाथ मोहोळकर, प्रवीण मोहोळकर, दत्ता कुंभार, संजय कुंभार, गणेश कुंभार, पृथ्वीराज निंबाळकर, राणा आर्य, परीक्षित राजमल्ले, परमेश्वर पाटील, आदित्य कमले इत्यादी उपस्थित होते.

## सेवा हक्क दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी–कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

लातूर :– महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हक्क दिन आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लोकसेवा हक्क विषयक शपथ घेतली. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत उपलब्ध विविध सेवांचा लाभ घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या क्यूआर कोड फलकाचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रभारी अतिरिक्त जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोजगार हमी योजना उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकट रावलोड आणि तहसीलदार काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम आणि त्याअंतर्गत अधिसूचित सेवांबाबत तसेच संबंधित तरतुदींची सविस्तर माहिती दिली. तहसीलदार काकडे यांनी आतापर्यंत प्रदान करण्यात आलेल्या सेवांचा आढावा सादर केला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांसाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याकरिता क्यूआर कोड तयार करण्यात आला आहे. या क्यूआर कोडच्या फलकाचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

# संभाजी महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर परीक्षा सुरळीत



मुरुड/महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ च्या पदवी व पदव्युत्तर परीक्षा सुरू आहेत. संभाजी महाविद्यालयातील आणि शिवाजी महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी परीक्षा देत आहेत. तसेच दुरस्थ शिक्षणाचे विद्यार्थी देखील पदव्युत्तर परीक्षा देत आहेत. सदरील परीक्षा प्राचार्य डॉ. अशोक काळम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत सुरू आहेत. परीक्षा केंद्रप्रमुख प्रा. मधुकर क्षीरसागर, सहायक केंद्रप्रमुख प्रा. डॉ. बी. एम. गोरे परीक्षेचे कामकाज पाहत आहेत. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. सुनिल पटाडे, श्री. भरतेश मांडवकर, श्री. प्रतिक जोशी यांच्यासह श्री. अरूण सवासे, श्री. सुनिल गाडे, श्री. बंकट घुटे, श्री. बी.बी.देशमुख आदी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करत आहेत.

# दिवंगत शांताबाई कवठेकर यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त गरजूंना अन्नदान वाटप संपन्न




लातूर : येथील विश्वनाथराव कवठेकर सेवाभावी संस्थेचे संचालक तथा युथ पँथर संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सिद्धार्थ भैया कवठेकर यांच्या मातोश्री दिवंगत शांताबाई भिमराव कवठेकर यांच्या प्रथम पुण्य स्मृती दिनानिमित्त अन्नदान वाटप करण्यात आले . दिवंगत शांताबाई भिमराव कवठेकर ह्या धडाडीच्या, मनमिळावू, स्पष्टवक्त्या आणि सामाजिक कार्यात त्यांचा पुढाकार अग्रेसर राहायचा. बौद्ध समाजातील महिला मंडळात ते आवर्जून कोणत्याही कार्यक्रमात भाग घेत होत्या. स्पष्ट वक्त्या असल्याने महिला मंडळ ही त्यांनाच पुढाकार देत होत्या. त्यांच्या पुढाकारातून बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार करण्यात येत होता. त्यांच्या या सामाजिक कार्यामुळे लातूर शहरात त्यांची एक आगळी वेगळी ओळख निर्माण झाली होती. त्यांची ही ओळख आजही न पुसणारी न मीटणारी आहे. त्यांच्या कार्याची आठवण असावी या अनुषंगाने २६ एप्रिल रोजी प्रथम स्मृती दिनानिमित्त लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय येथे गरजूंना आणि रुग्णांच्या नातेवाईकांना मोफत अन्नदान वाटप करण्यात आले. यावेळी विलासराव देशमुख रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सचिन जाधव, संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सिद्धार्थ कवठेकर, प्रवक्ता मार्गदर्शक प्रतापजी कांबळे, संपर्कप्रमुख विदेश सोमवंशी, सामाजिक कार्यकर्ते अनिसखान पठाण, राजूभाई सिद्दिकी, बालाजी कांबळे, युवा उद्योजक नागेश जवळकर, कलीम बागवान व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना व सकल मातंग समाजाचा २० मे रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर मोर्चा–सचिनभाऊ साठे



लातूर :– डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना व सकल मातंग समाजाच्या वतीने अनुसूचित जातीतील वर्गीकरण अ ब क साठी २० मे रोजी आझाद मैदान मुंबई येथे भव्य मोर्चाचे आयोजन आले असून या मोर्चाला महाराष्ट्रातील सर्व मातंग समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक येथे आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिनभाऊ साठे यांनी केले आहे.
गांधी मैदान येतील भालचंद्र ब्लड बँक येथे डॉ. आण्णाभाऊ साठे क्रांती सेना व सकल मातंग समाज लातूर यांच्या वतीने राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या पूर्वी डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे बोलत होते. ते म्हणाले की मातंग समाजाचे अनुसूचित जातीतील वर्गीकरण अ ब क ड ची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित असून या मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर २० मे रोजी भव्य असा मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात मातंग समाज एकत्र येऊन सरकारला मोठ्या संख्येने संख्येने समाजाच्या वेदना दिसाव्यात तसेच या विषयावर सरकार गंभीर राहिले पाहिजे तसेच सदर मोर्चा कोणाच्या विरोधात नाही आमच्या हक्कासाठीच असल्याचे अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिनभाऊ साठे यांनी यावेळी बोलताना सांगितले. या पत्रकार परिषदेस राज क्षीरसागर ऍड. टी एन कांबळे, पंडित सूर्यवंशी तसेच डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना व सकल मातक मातंग समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सह्याद्री स्कूल ऑफ आर्टला उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची सदिच्छा भेट





सावर्डे / प्रतिनीधी :– महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी चिपळूण तालुक्यातील सावर्डे येथे असलेल्या सह्याद्री स्कूल ऑफ आर्ट या चित्रशिल्प कलामहाविद्यालयाला रविवारी सदिच्छा भेट दिली.
या भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री यांनी महाविद्यालयातील विविध विभागांना भेट देत विद्यार्थ्यांची कलाकृती पाहिली. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेने आणि मेहनतीने मंत्रमुग्ध झालेल्या अजितदादांनी त्यांच्या कामाचे भरभरून कौतुक केले.
विद्यार्थ्यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळविला आहे, ही महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.
सह्याद्री स्कूल ऑफ आर्ट हे संस्थान ग्रामीण भागात असूनही उत्कृष्ट दर्जाचे कलाशिक्षण देत आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि शिक्षकांची समर्पित वृत्ती यामुळे हे महाविद्यालय वेगळी ओळख निर्माण करत आहे, असेही त्यांनी नमूद केले.
या भेटीप्रसंगी चिपळूण– संगमेश्वर मतदारसंघाचे आमदार व सह्याद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष शेखर गोविंदराव निकम उपस्थित होते. त्यांनीही संस्थेच्या वाटचालीचा आढावा दिला आणि उपमुख्यमंत्री महोदयांचे आभार मानले.
अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक अनुभवी आणि दूरदृष्टीचे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री अशा अनेक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. ग्रामीण भागातील शिक्षण आणि कला संस्थांच्या प्रगतीसाठी त्यांचा नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन राहिला आहे.
या भेटी दरम्यान कोकणचे जेष्ठ चित्रकार शिल्पकार प्रकाश राजेशिर्के यांनी आपले चित्र भेट स्वरूपात अजितदादा यांना दिले. अजितदादांची ही भेट सह्याद्री स्कूल ऑफ आर्टच्या वाटचालीस नवे बळ देणारी ठरली.

# 'दहशतवादाचा नवा चेहरा..देशात ५ लाख पाकिस्तानी मुली '; निशिकांत दुबे यांनी उपस्थित केला गंभीर प्रश्न

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, अटारी सीमेवर पाकिस्तानात परतण्यासाठी लोकांची लांब रांग दिसून आली. भारत सरकारने पाकिस्तानी नागरिकांना दिलेले व्हिसा रद्द केले होते आणि त्यांना ४८ तासांच्या आत देश सोडण्यास सांगितले होते. भारतात लग्न झालेल्या महिलांची मोठी संख्याही पाकिस्तानात परतण्यासाठी सीमेवर पोहोचली. आता,भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी सोशल मीडियावर याबद्दल पोस्ट केले आहे.
रात घुसलेल्या या शत्रूंशी कसे लढायचे
निशिकांत दुबे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, पाकिस्तानी दहशतवादाचा एक नवा चेहरा आता समोर आला आहे. त्यांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, भारतीयांशी लग्न करून पाच लाखांहून अधिक पाकिस्तानी मुली भारतात राहत आहेत. आजपर्यंत त्याला भारतीय नागरिकत्व मिळालेले नाही. निशिकांत दुबे यांनी प्रश्न उपस्थित करत,घरात घुसलेल्या या शत्रूंशी कसे लढायचे? असे म्हटले.
सरकार कोणत्याही किंमतीत याचा बदला घेईल निशिकांत दुबे यांनी एक दिवस आधी पहलगाम हल्ल्याचा संदर्भ देत,पाकिस्तानी सैन्याने निवडकपणे भारतीयांना, विशेषतः हिंदूंना मारले आहे. मोदी सरकार कोणत्याही किंमतीत याचा बदला घेईल. त्यांनी असेही म्हटले होते की पाकिस्तानने घेतलेला काश्मीरचा भाग कोणत्याही किंमतीत परत घेतला जाईल. पाकिस्तानचे विभाजन करून, बलुचिस्तान, पश्तूनिस्तान आणि पंजाब हे वेगळे देश बनतील.
निशिकांत दुबे यांनी दावा केला की, पंतप्रधान मोदी हे करतील. जर या वर्षानंतर पाकिस्तानचे अनेक तुकडे झाले नाहीत, तर लोक असे म्हणण्यास मोकळे होतील की भाजपचे लोक खोटे आश्वासन देतात. पाकिस्तान संपेल. जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. या दहशतवादी घटनेनंतर भारताने कठोर कारवाई करत सिंधू पाणी करार स्थगित केला आणि पाकिस्तानी नागरिकांना दिलेले व्हिसाही रद्द केले.

# शाहू विद्या मंदिर शाळेत जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२५ निमित्त कार्यक्रम संपन्न



केज/प्रतिनिधी–शाहू विद्या मंदिर शाळेत जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२५ निमित्त कार्यक्रम संपन्न झाला.जलसाक्षरता ही काळाची गरज असे प्रतिपादन वृंदा नायर यांनी केली आहे. केज तालुक्यासह शहरात सध्या पाण्याची मोठ्या प्रमाणात टंचाई जाणवू लागली आहे. काही ठिकाणी पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पाणी जतन करून, बचत करणे व त्याचा योग्य वापर करणे ही काळाची गरज आहे,प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. आपल्याकडून पाणी कुठे वाया जाते याचा विचार करून पाण्याचा योग्य पद्धतीने गरजेनुसारच वापर करण्यात यावा. हे प्रत्येक नागरिकांनी स्वतःची जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे यासाठी जलसाक्षरता होणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन सहाय्यक अभियंत्या श्रीमती वृंदा नायर यांनी केले.
केज शहरातील राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२५ या कार्यक्रमामध्ये त्या बोलत होत्या.
जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२५ ता. केज जि. बीड हा कार्यक्रम जलसंपदा विभाग, लघु पाटबंधारे उपविभाग केज व जलसिंचन शाखा केज यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी. बी. यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. यावेळी मंचावर श्रीमती वृंदा अ. नायर –सहायक अभियंता श्रेणी १,श्रीमती आरती म. झाडबुके –कनिष्ठ अभियंता, श्रीमती वर्षा जाधव –स्थापत्य अभियांत्रिकी सहायक व श्री.सुरज राजे यांची प्रमुख उपस्थिती होती.
वृंदा नायर पुढे बोलताना म्हणाल्या गोदावरी नदीवर अनेक प्रकल्प नियोजित आहेत ते पूर्ण झाल्यावर पाण्याची बरीच समस्या दूर होऊ शकते.त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशीही संवाद साधला व पाणी टंचाई कशी दूर करता येईल यावर विद्यार्थ्यांना बोलते करत पाण्याचा योग्य वापर,व्यवस्थापन,संवर्धन आणि जागरूकता याची माहिती दिली.कार्यक्रम प्रसंगी श्रीमती वर्षा जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पाण्याचे महत्व सांगितले.
यावेळी त्या म्हणाल्या पाणी हा मानवी जीवनातील मूलभूत घटक आहे. आपल्याला पिण्यासाठी,विविध घरकामासाठी,शेतीसाठी,उद्योग – धंद्यासाठी पाण्याची खूप गरज आहे. वाढती लोकसंख्या व बदलणारे निसर्गचक्र यामुळे पाण्याची कमतरता मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळावा लागणार आहे. पावसाळ्यात पडणारे पाणी आपल्याच भागात अडवणे व जिरवणे यातून जमिनीची पाणी पातळी वाढून पाणी संकट दूर होईल.
शाळेतील शिक्षक श्री. क्षीरसागर आर.एस.यांनी जल प्रतिज्ञेचे वाचन केले. अध्यक्षीय समारोपात श्रीमती चाटे बी. बी. यांनी बोअर पुनर्भरणाची माहिती सांगितली व मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याचे आवाहन केले.
कार्यक्रमाचे संचलन श्री.यादव व्ही.बी.यांनी केले तर आभार श्री. देशमुख ए.डी. यांनी मानले.कार्यक्रम प्रसंगी लघु पाटबंधारे उपविभाग केज येथील श्री.अनंत घोळवे,श्री.बडे वाय. जे.,श्री. अमोल गुंठाळ,संजय वाघमारे,श्री.अशोक वैरागे,श्री. सुदाम दराडे,पि. पि. पवार,एस. हांगे,एस.बोराडे तसेच शाळेतील शिक्षकवृंद श्री.डिरंगे जि.बी.श्री.मस्के जे.आर. श्रीमती अनिता जाधव,श्रीमती ध्वजा गायकवाड व विद्यार्थी उपस्थित होते.

## काँग्रेस नेते दहशतवाद्यांना 'निर्दोष' ठरवण्याचा प्रयत्न करताहेत का?; बावनकुळेंचा वडेट्टीवारांवर हल्लाबोल

पहलगाममधील दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला. पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन त्यांच्यावर गोळीबार करण्यात आल्याची माहिती हल्ल्यातील पीडितांनी दिली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. दहशतवादी हल्ला करतेवेळी लोकांशी बोलत बसतात का? धर्म विचारत बसतात का? असे प्रश्न काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे. यानंतर आता भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीका केली आहे. 'काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार कोणत्या जगात वावरत आहेत' चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'एक्स' या सोशल मीडिया अकाऊंटवर लिहिले की, विजय वडेट्टीवार यांचं वक्तव्य म्हणजे असंवेदनशीलतेचा कळस आहे. काश्मीरमध्ये हिंदूंना टार्गेट केलं जातं हे वेळोवेळी सिद्ध झालं आहे. मग काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार कोणत्या जगात वावरत आहेत दहशतवाद्याला जात–धर्म नसतो असं म्हणून वडेट्टीवार कोणाला खूश करू पाहत आहेत? काँग्रेस नेते दहशतवाद्यांना निर्दोष ठरवण्याचा प्रयत्न करताहेत का? विजय वडेट्टीवार यांचं वक्तव्य म्हणजे असंवेदनशीलतेचा कळस आहे.काश्मीरमध्ये हिंदूंना टार्गेट केलं जातं हे वेळोवेळी सिद्ध झालं आहे. मग काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार कोणत्या जगात वावरत आहेत दहशतवाद्याला जात–धर्म नसतो असं म्हणून वडेट्टीवार कोणाला खूश करू पाहत आहेत? काँग्रेस नेते पुढे ते म्हणाले, विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्यामुळे दहशतवाद्यांचा चेहरा झाकण्याचा, त्यांना संरक्षण देण्याचा किळसवाणा प्रयत्न दिसतो. हा केवळ बेजबाबदारपणा नाही, तर देशविरोधी मानसिकतेचं उदाहरण आहे. देशावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक भारतीयानं वडेट्टीवार यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध करायला हवा. काँग्रेसचे नेते भारतीयांच्या भावनांशी खेळत आहेत, जखमांवर मीठ चोळत राजकारण करत आहेत, जनता हे विसरणार नाही, असा हल्लाबोल बावनकुळे यांनी वडेट्टीवार यांच्यावर केला. काय म्हणाले होते विजय वडेट्टीवार ? पहलगाम हल्ला हे सरकारचं अपयश नाही का? त्यावर या सरकारमधील लोक काहीच बोलत नाहीत. हे लोक काय बोलतात तर दहशतवाद्यांनी धर्म विचारून पर्यटकांना मारलं.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE